नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २८२ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




रविवार दि. २७ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# चव्हाण परिवाराचा आधारवड हरपला

# गं.भा. कै. सईद्राबाई चव्हाण यांचे निधन!

## आदर्श माता, सासू, सून आणि कुटुंबाचा आधारवड हरपला; संस्कारांचा वटवृक्ष उभा करणाऱ्या माऊलीला भावपूर्ण श्रद्धांजली!





: लेखन :
**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

जुन्नर : अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी... गोठ्यातली गाय हरपली, माणसातली माय हरपली... या शब्दांत व्यक्त करावी, अशी माया, ममता आणि संस्कारांची सावली देणाऱ्या जुन्नर तालुक्यातील वडज येथील प्रगतशील शेतकरी व वारकरी संप्रदायाची परंपरा जपणाऱ्या गं.भा. कै. सईद्राबाई मार्तंड चव्हाण (वय ७५) यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने चव्हाण परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, एक आदर्श माता, सासू, सून आणि संपूर्ण कुटुंबाचा आधारवड हरपल्याची भावना नातेवाईक, ग्रामस्थ आणि परिचितांकडून व्यक्त होत आहे.

शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्यालगत असलेल्या जुन्नर तालुक्यातील ग्रामीण संस्कृती, कष्ट आणि माणुसकीची परंपरा जपत सईद्राबाईंनी आपले संपूर्ण आयुष्य कुटुंबासाठी समर्पित केले. त्यांचे माहेर उच्छील येथील नवले परिवारातील होते. भीमाजी नवले यांच्या कन्या असलेल्या सईद्राबाईंचा विवाह वडज येथील चव्हाण परिवारात मार्तंड चव्हाण यांच्याशी झाला. विवाहानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी संसाराची जबाबदारी स्वीकारली. आर्थिक परिस्थिती नाजूक असतानाही पतीच्या खांद्याला खांदा लावून शेती आणि संसाराची जबाबदारी सांभाळत त्यांनी कुटुंबाला उभारी दिली.

सईद्राबाई आणि मार्तंड चव्हाण यांनी आपल्या संसारात चार मुलांना-लता, सुनील, नवनाथ आणि छाया-उत्तम संस्कार दिले. मुलांना केवळ शिक्षण आणि संसाराचे धडे न देता माणुसकी, कष्ट, प्रामाणिकपणा, दुसऱ्यांच्या सुख-दुःखात धावून जाणे आणि आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करणे, ही जीवनमूल्ये त्यांनी आपल्या कृतीतून शिकवली. त्यामुळे चव्हाण परिवारातील पुढील पिढीनेही समाजात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.सईद्राबाईंच्या कुटुंबाने शेती क्षेत्राबरोबरच सामाजिक, राजकीय, उद्योग आणि विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटवला. त्यांचे सुपुत्र नवनाथ चव्हाण यांनी मुंबईतील घाटकोपर परिसरात भारतीय जनता पक्षाचे महामंत्री म्हणून काम करताना आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. सुनील चव्हाण हे शेती क्षेत्रात कार्यरत आहेत. मुलगी लता यांचा संसार पिंपळगाव घोलप येथे असून, छायाताई या नामांकित विधितज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या यशामागे सईद्राबाईंच्या संस्कारांचा मोठा वाटा असल्याचे नातेवाईक सांगतात.

**परिस्थितीशी संघर्ष करत उभा केला संसार:**

सईद्राबाईंच्या आयुष्यात अनेक चढ-उतार आले. मात्र, त्यांनी कोणत्याही परिस्थितीसमोर हार मानली नाही. पती मार्तंड चव्हाण यांच्या सोबत शेती आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी अनेकांना आधार दिला. जुन्नर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील अनेक कुटुंबांना त्यांनी रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या दारात आलेल्या गरजू व्यक्तीला शक्य तेवढी मदत करणे, हा त्यांच्या स्वभावाचा भाग होता. मदत करताना मोबदल्याची अपेक्षा न ठेवता केवळ माणुसकीच्या भावनेतून त्यांनी अनेकांना साथ दिली. पारखे परिवार, चव्हाण परिवार आणि नवले परिवार यांच्यातील जिव्हाळ्याचे संबंधही त्यांनी कायम जपले. जानकु सखाराम पारखे बाबा यांच्या नेतृत्वाखालील या परिवारांच्या नातेसंबंधात प्रेम, विश्वास आणि परस्पर सन्मानाची परंपरा कायम राहिली. मार्तंड चव्हाण आणि त्यांच्या परिवारानेही या नात्यांना आयुष्यभर जपले.

**आईच्या संस्कारांची शिदोरी घेऊन मुलांनी उभारला वेगळा ठसा:**

आई ही केवळ घरातील व्यक्ती नसते, तर ती संपूर्ण कुटुंबाला जोडणारी शक्ती असते, याचा प्रत्यय सईद्राबाईंच्या जीवनाकडे पाहिल्यानंतर येतो. त्यांच्या चारही मुलांच्या सुख-दुःखात त्या सदैव खंबीरपणे उभ्या राहिल्या. मुलगा नवनाथ मुंबईसारख्या महानगरात कार्यरत असतानाही आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करत नाही, तर आपल्या परिवाराबरोबरच विस्तारित परिवारातील प्रत्येक व्यक्तीचा विचार करतो, याचा त्यांना विशेष आनंद होता.

नवनाथ चव्हाण आणि दशरथ चव्हाण यांनी आई-वडील, चुलते आणि चुलती यांनी दिलेले संस्कार पुढे नेत समाजातील दिनदुबळ्यांना मदत करणे, गरजूंच्या पाठीशी उभे राहणे आणि प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करणे, ही परंपरा जपली. अतिथी देवो भव ही भावना चव्हाण परिवाराच्या आचरणातून दिसून येते. त्यामुळे सईद्राबाईंच्या संस्कारांची पाळेमुळे केवळ त्यांच्या घरापुरती मर्यादित न राहता समाजापर्यंत पोहोचली.

**अभिष्टचिंतन सोहळ्याची आठवण:**

गेल्या दोन-तीन महिन्यांपूर्वीच सुपुत्र नवनाथ चव्हाण यांनी आपल्या मातोश्री सईद्राबाई तसेच चुलते शांताराम चव्हाण आणि चुलती यांच्या अभिष्टचिंतनाचा सोहळा आयोजित केला होता. या कार्यक्रमातून आई-वडील, चुलता-चुलती यांनी आपल्या जीवनाला दिलेल्या दिशा आणि संस्कारांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली होती.ज्या आई-वडिलांनी बोटाला धरून जीवनाच्या वाटेवर चालायला शिकवले, ज्या चुलता-चुलतींनी अडचणीच्या काळात खंबीर साथ दिली, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना या सोहळ्यातून दिसून आली. या सोहळ्याची आठवण आज संपूर्ण चव्हाण परिवाराच्या डोळ्यांत अश्रू आणणारी ठरत आहे.

**कुटुंबासाठी गणपती बाप्पाकडे मागितली असेल सुख-शांतीची प्रार्थना:**

गणेशोत्सवाच्या काळात घरातील गणपती बाप्पाची भक्तिभावाने सेवा करणाऱ्या सईद्राबाईंनी या विघ्नहर्त्याकडे आपल्या परिवारासाठी सुख, समाधान आणि एकोप्याचीच प्रार्थना केली असावी. माझ्या परिवारावर कोणतेही संकट येऊ नये, माझी मुले सुखी राहावीत, त्यांच्या संसारात आनंद नांदावा, हीच एका आईची अखेरपर्यंतची भावना असते.

नुकतीच त्यांच्या एका मुलीच्या निधनाची वेदनाही त्यांच्या मनात होती. त्या दुःखाच्या काळातही मुलगा नवनाथ चव्हाण यांनी बहिणीसाठी भावाची जबाबदारी अत्यंत जिव्हाळ्याने पार पाडली. आपल्या मुलांमधील प्रेम, एकोपा आणि परस्परांची काळजी पाहून सईद्राबाईंना समाधान वाटत होते.

**दशरथ चव्हाण यांच्या मोठ्या आई; पत्रकारिता क्षेत्रातही जिव्हाळ्याचे नाते:**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष तथा दैनिक समर्थ गांवकरीचे नवी मुंबई विभागीय संपादक दशरथ चव्हाण यांच्या त्या मोठ्या आई होत. पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या परिवारातील सदस्यांना त्यांनी सदैव मायेची ऊब आणि मानसिक आधार दिला. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला एकत्र ठेवण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले.दीर शांताराम चव्हाण यांची खंबीर साथ आणि संपूर्ण चव्हाण परिवारातील परस्परांचे प्रेम यामुळे परिवाराने सामाजिक क्षेत्रातही अनेक उपक्रमांमध्ये आघाडी घेतली. या सर्वांच्या मागे सईद्राबाईंच्या मायेची आणि संस्कारांची सावली होती.

**परमेश्वराला प्रत्येक घरात राहता येत नाही म्हणून आई दिली...**

परमेश्वराला प्रत्येक घरात राहता येत नाही म्हणून त्याने आई दिली, असे म्हटले जाते. सईद्राबाईंचे जीवन या भावनेचे जिवंत उदाहरण होते. घरातील प्रत्येक सदस्याच्या चुकांवर प्रेमाने पांघरूण घालत, योग्य मार्ग दाखवत आणि मुलांना स्वतःच्या आयुष्याचे शिल्पकार बनण्याची प्रेरणा देत त्यांनी कुटुंब घडवले.आज ही माऊली शरीराने आपल्यात नसली तरी त्यांनी निर्माण केलेला संस्कारांचा वटवृक्ष कायम उभा राहणार आहे. त्या वटवृक्षाच्या सावलीत त्यांच्या मुलांची, नातवंडांची आणि पुढील पिढ्यांची वाटचाल सुरू राहील. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नसली, तरी त्यांनी दिलेली माया, संस्कार, माणुसकी आणि कुटुंबाला एकत्र ठेवण्याची शिकवण कायम स्मरणात राहील.

गं.भा. कै. सईद्राबाई मार्तंड चव्हाण यांच्या निधनाने चव्हाण परिवारासह नवले आणि पारखे परिवारावरही दुःखाची छाया पसरली आहे. त्यांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली!

---

## महाराष्ट्रात "SIR' बाबत दावे- हरकतींसाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ, निवडणूक आयोगाचा निर्णय

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेत महाराष्ट्रातील मतदारांना दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी निवडणूक आयोगाने १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच नोटीस बजावलेल्या आणि मतदार यादीत नाव जुळत नसलेल्या किंवा तर्कसंगत विसंगती आढळलेल्या व्यक्तींच्या घरी जाऊन संबंधित कागदपत्रे घेण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. त्यामुळे अशा मतदारांना प्रत्येक वेळी निवडणूक नोंदणी अधिकाऱ्याच्या कार्यालयात सुनावणीसाठी बोलावले जाणार नाही. केंद्रीय निवडणूक आयोगाची बैठक शनिवारी, २६ सप्टेंबर रोजी झाली. या बैठकीत महाराष्ट्रासाठी दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच नोटिसांवरील निर्णय आणि दावे-हरकती निकाली काढण्याची मुदत १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. दिल्लीसाठीही दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत ३० ऑक्टोबर, तर त्यावरील निर्णयाची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे.

एसआयआर प्रक्रियेदरम्यान 'अनमॅप्ड' म्हणजे संबंधित नोंदीशी जुळवणी न झालेल्या किंवा तार्किक विसंगती आढळलेल्या मतदारांना नोटीस बजावण्यात आली असल्यास, संबंधित बूथस्तरीय अधिकारी (बीएलओ) त्यांच्या घरी भेट देऊन आवश्यक कागदपत्रे गोळा करतील.

---

## घोडेगाव आदिवासी प्रकल्पाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा!

## मुख्याध्यापक सुरेश तुकाराम हुले यांना गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर!

**पुणे (समर्थ गांवकरी)**



घोडेगाव आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आहुपे येथील आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुरेश तुकाराम हुले यांना खेड तालुका माध्यमिक मुख्याध्यापक संघाकडून 'गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. अतिदुर्गम भागात शिक्षणाची ज्योत तेवत ठेवत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक विकासासाठी सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या हुले सरांच्या कार्याची या पुरस्काराच्या माध्यमातून दखल घेण्यात आली आहे.

डिंभे धरणाच्या पश्चिमेला सह्याद्रीच्या शेवटच्या टोकावर अतिदुर्गम भागात आहुपे आश्रमशाळा असून येथे निवासी विद्यार्थी शिक्षण घेतात. गेल्या काही वर्षांपासून हुले सर मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. केवळ पुस्तकी शिक्षण न देता विद्यार्थ्यांना आई-वडिलांप्रमाणे आधार देत त्यांच्यावर चांगले संस्कार घडविणे, शिस्त, स्वच्छता, सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास निर्माण करणे, हा त्यांचा ध्यास आहे. इंटरनेटच्या युगात विद्यार्थ्यांना संस्कारक्षम आणि जबाबदार नागरिक बनविण्याची गरज असताना हुले सर त्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत.

दोन्ही पायांनी अपंगत्व असतानाही त्यांनी आपल्या कार्यात कोणतीही अडचण येऊ दिली नाही. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आहुपे आश्रम शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून हॉलीबॉल, कबड्डी, भालाफेक, खो-खो आदी विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांची विभागीय व राज्यस्तरीय निवडी झाल्या आहेत. शाळेचा परिसर सुंदर आणि स्वच्छ ठेवण्यासाठी परसबाग, फुलबाग, वृक्षलागवड, स्वच्छता मोहीम यांसारखे उपक्रम राबविले जातात. तसेच विविध गुणदर्शन कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो. पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये सातत्याने संवाद व समन्वय साधत शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न केले जातात. त्यांच्या कार्यकाळात आहुपे आश्रमशाळेने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

हुले सरांना यापूर्वीही त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. रोटरी क्लबतर्फे गुणवंत शिक्षक, इन्स्पायर फाउंडेशनतर्फे आदर्श शिक्षक, सकाळ समूहाकडून आदर्श मुख्याध्यापक, माजी विद्यार्थी संघाकडून आदर्श गुरु तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षण सेनेकडून आदर्श शिक्षक अशा विविध पुरस्कारांनी त्यांचा सन्मान झाला आहे. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत खेड तालुका माध्यमिक मुख्याध्यापक संघाने गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर केल्याने घोडेगाव आदिवासी विकास प्रकल्पाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल शिक्षण क्षेत्रातून तसेच पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांकडून अभिनंदन होत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

---

# रोजगार महाकुंभाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते २९ सप्टेंबरला उद्घाटन, राज्यभरात विविध ठिकाणी आयोजन; 'लाडक्या बहिणीं' साठी स्वतंत्र रोजगार मेळावा

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी येत्या २९ सप्टेंबरला 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ महाराष्ट्र'चे आयोजन करण्यात आले आहे. कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाचा शुभारंभ एसएनडीटी महिला विद्यापीठात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. राज्यभर विविध ठिकाणी रोजगार मेळावे आणि प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करून नोकरीच्या शोधात असलेले उमेदवार आणि विविध क्षेत्रांतील कंपन्या व नियोक्ते यांना एका व्यासपीठावर आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाच्या मुंबईतील उद्घाटन कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मंत्री चंद्रकांत पाटील, मंगल प्रभात लोढा, उदय सामंत, जयकुमार रावल, आकाश फुंडकर, महापौर रितू तावडे, खासदार मिलिंद देवरा आणि अरविंद सावंत यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रोजगार महाकुंभामध्ये फक्त रोजगार मेळावे घेण्याऐवजी उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, कौशल्य आणि अनुभव यांची उपलब्ध रोजगाराच्या संधींशी सांगड घालण्यावर भर देण्यात आला आहे. त्यासाठी उमेदवार आणि कंपन्यांकडील रिक्त पदांचे 'कॅन्डिडेट-व्हॅकन्सी मॅचिंग' करण्यात येणार आहे. उमेदवाराच्या पात्रतेनुसार उपलब्ध पदांची माहिती मिळवून त्याला संबंधित नियोक्त्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या प्रक्रियेत केला जाणार आहे.

रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच उमेदवारांना निवड प्रक्रियेसाठी तयार करण्यावरही भर देण्यात आला आहे. मुलाखतीची तयारी, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि सॉफ्ट स्किल्स यासाठी प्री-प्लेसमेंट प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यातील बॅच ७ ते १० सप्टेंबरदरम्यान, तर दुसऱ्या टप्प्यातील बॅच २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान आयोजित करण्यात आली. त्यामुळे रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांना कंपन्यांच्या भरती प्रक्रियेला सामोरे जाण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार आहे. रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून विविध क्षेत्रांतील नियोक्ते आणि रोजगाराच्या शोधात असलेले युवक-युवती यांच्यात थेट संपर्क निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. उपलब्ध रिक्त पदांची माहिती, उमेदवारांची पात्रता आणि कंपन्यांच्या अपेक्षा यांची सांगड घालून भरती प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे.

दरम्यान, रोजगार महाकुंभाचा विशेष भाग म्हणून एसएनडीटी महिला विद्यापीठात महिलांसाठी स्वतंत्र रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात सुमारे ६०० ते ७०० महिला उमेदवार सहभागी होण्याची अपेक्षा आहे. विविध कंपन्यांचे स्टॉल्स या ठिकाणी उभारण्यात येणार असून, संबंधित कंपन्यांमधील उपलब्ध रोजगाराच्या संधींबाबत महिलांना माहिती मिळणार आहे. उपलब्ध पदे, त्यासाठी




आवश्यक शैक्षणिक पात्रता व कौशल्ये, कामाचे स्वरूप, वेतनश्रेणी तसेच भरती प्रक्रियेची माहिती महिलांना या मेळाव्यात मिळणार आहे. त्याचबरोबर कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधण्याची आणि मुलाखतीला सामोरे जाण्याची संधीही उमेदवारांना उपलब्ध होणार आहे. महिलांच्या कौशल्याला रोजगाराच्या संधींशी जोडून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी चालना देणे, हा या विशेष मेळाव्याचा उद्देश आहे.

---

## संक्षिप्त

### रविवारी मध्य रेल्वे मार्गावर मेगा ब्लॉक; सेवांमध्ये बदल

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाकडून रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे केली जाणार आहेत. यासाठी मेन लाईनवर माटुंगा ते मुलुंड आणि हार्बर लाईनवर कुर्ला ते वाशी दरम्यान मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे लोकलच्या वेळापत्रकावर परिणाम होणार असून प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करून घराबाहेर पडण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

मेन लाईनवर मेगा ब्लॉक-माटुंगा-मुलुंड दरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ३.४५ वाजेपर्यंत ब्लॉक असेल. या काळात सीएसएमटीहून सुटणाऱ्या डाऊन जलद लोकल माटुंगा येथे धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. त्या माटुंगा ते मुलुंड दरम्यानच्या निर्धारित स्थानकांवर थांबतील आणि गंतव्यस्थानी सुमारे १५ मिनिटे उशिराने पोहोचतील.

### दिल्लीतील महाराष्ट्र सदनात गणेशोत्सवाची दिमाखात सांगता

**भव्य मिरवणुकीने गणरायाला निरोप**

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

राजधानी दिल्लीतील कोपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनात १४ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. गणेशमूर्तीच्या विसर्जनापूर्वी भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात दिल्लीकर आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले. विसर्जन कार्यक्रमाची सुरुवात जुन्या महाराष्ट्र सदनातून झाली. निवासी आयुक्त गुंतवणूक सुशील गायकवाड यांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली. त्यानंतर झांज पथक आणि ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीला सुरुवात झाली. जुन्या महाराष्ट्र सदनापासून नव्या महाराष्ट्र सदनापर्यंत काढण्यात आलेल्या या मिरवणुकीमुळे परिसर भक्तिमय आणि चैतन्यमय झाला. नव्या महाराष्ट्र सदनात पोहोचल्यानंतर विधिवत धार्मिक विधी पार पाडून गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

### चारधाम यात्रा दोन दिवसांसाठी बंद

**उत्तराखंडमध्ये अनेक जिल्ह्यांना रेड अलर्ट**

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

चारधाम यात्रेकरूंच्या दृष्टीने महत्त्वाची बातमी आहे. खराब हवामानामुळे चार धाम यात्रा दोन दिवसांकरिता स्थगित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. उत्तराखंडमध्ये हवामान विभागाने दिलेल्या रेड आणि ऑरेंज अलर्टमुळे चारधाम यात्रा व्यवस्थापन आणि नियंत्रण संस्थानाकडून हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारने दिलेला रेड आणि ऑरेंज अलर्ट लक्षात घेता, आज आणि उद्या (शनिवार- रविवार) असे दोन दिवस यात्रा स्थगित केल्याची माहिती समोर आली आहे. हवामान विभागाकडून उत्तराखंडमधील अनेक जिल्ह्यांसाठी रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे तिथल्या नागरिकांना काही आवश्यक काम असल्यास घराबाहेर पडण्याचे आदेशही देण्यात आले आहे. गढवालचे आयुक्त आनंद स्वरूप यांनी या संदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना एक पत्र जारी केले आहे. चारधामच्या ठिकाणाच्या व्यवस्थेवर सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारीदेखील बारकाईने लक्ष ठेवून आहेत. आयुक्तांनी जारी केलेल्या पत्रामध्ये, हवामान खात्याने दिलेला अंदाज आणि भाविकांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर, रेड अलर्टमुळे चार धाम यात्रा शनिवार दुपारपासून रविवारपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे. आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आपापल्या जिल्ह्यांमध्ये खबरदारीचे उपाय देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान अनुकूल झाल्यावरच यात्रा पुन्हा सुरू होईल, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. हवामान विभागाने २६ आणि २७ सप्टेंबर रोजी उत्तराखंडमधील अनेक जिल्ह्यांसाठी पावसाचा 'रेड' आणि 'ऑरेंज' अलर्ट जारी केला आहे. काही जिल्ह्यांसाठी 'यलो' अलर्टही जारी करण्यात आला आहे.

# २५१ कोटींच्या ठेवींचे बळ; आता ३०० कोटींच्या लक्ष्याकडे वाटचाल

## ‘अ’ वर्गासह ३ कोटींचा नफा; पारनेर ग्रामीण पतसंस्था १२ टक्के लाभांश देणार : आ. काशिनाथ दाते

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

सभासदांचा विश्वास आणि पारदर्शक कारभाराच्या बळावर पारनेर ग्रामीण पतसंस्थेने आर्थिक प्रगतीची वाटचाल कायम ठेवली असून, मार्च २०२६ अखेर संस्थेने २५१ कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा गाठला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेला ३ कोटी ३ लाख १२ हजार ६१७ रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली.

पारनेर ग्रामीण पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थापक चेअरमन तथा पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली मनकर्णिका लॉन्स, पारनेर येथे संपन्न झाली. यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन सुरेश बोरुडे, संचालक मंडळाचे सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात तसेच सभासद व कर्मचारी उपस्थित होते.

संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा देताना आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले की, संस्थेला यंदा ऑडिटमध्ये ‘अ’ वर्ग मिळाला असून बँक गुंतवणूक १०४ कोटी रुपये, तर स्थावर मालमत्ता ३ कोटी ५४ लाख रुपये आहे. सभासदांच्या गरजा तसेच व्यवसायवृद्धीसाठी संस्थेने १७५ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले आहे.

पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई जिल्ह्यापर्यंत विस्तारले असून, पारनेर, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, बेलवंडीफाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा, सुपा, कामोठे, अहिल्यानगर, वनकुटे, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखांमधून संस्थेचा कारभार सुरू आहे.

संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे, खडकवाडी, आळेफाटा, शिरूर व सुपा येथे स्वमालकीच्या इमारती आहेत. तसेच पारनेर, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, सुपा, बेलवंडीफाटा, जामगाव व ढवळपुरी येथे सभासदांसाठी लॉकर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सभेच्या प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, शिक्षण महर्षी डॉ. वाय. पाटील तसेच अहवाल सालातील दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सेवानिवृत्त एसीपी डॉ. सिताराम कोल्हे, ए.टी.सी.सी. बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, माजी जि.प. सदस्य वसंतराव चेडे, माजी उपनगराध्यक्ष दत्तात्रय कुलट, माजी संचालक विठ्ठलराव औटी व माजी सरपंच जयसिंग मापारी यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषयपत्रिकेवरील सर्व विषय सभासदांनी एकमताने मंजूर केले. सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सूत्रसंचालन रखमाजी कापसे यांनी केले, तर व्हा. चेअरमन सुरेश बोरुडे यांनी आभार मानले. सभेनंतर सभासदांना संस्थेच्या वतीने मिष्टान्न भोजन देण्यात आले.




### ३०० कोटींच्या ठेवींचे लक्ष्य....

मार्च २०२६ अखेर संस्थेच्या ठेवी २५१ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत. २३ वर्षांच्या कालावधीत सभासदांनी संस्थेवर दाखविलेला हा विश्वास आहे. याच विश्वासाच्या बळावर मार्च २०२७ अखेर ठेवी ३०० कोटी रुपयांचा टप्पा पार करतील.

**– सुरेश बोरुडेसर. व्हा. चेअरमन**

# श्रीराम साधना आश्रमात महंत श्री सुनीलगिरीजी बाबांच्या मौन व्रत व अनुष्ठानाची भक्तिमय वातावरणात सांगता

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील मुकींदपूर येथील श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या बारा दिवशीय मौनव्रत व अनुष्ठानाची शनिवारी दि.२६ सप्टेंबर रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.भटकणारे चित्त एक होण्यासाठी व धर्माचे वैभव वाढविण्यासाठी मौन व्रत अनुष्ठान मागचा मुळ उद्देश असून स्वतःमध्ये भगवंत पहाण्यासाठी जीवनात तप करा असे आवाहन महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले. गणेशोत्सवानिमित्त गुरुवर्य महंत सुनिलगिरीजी महाराज यांनी दि.१४ सप्टेंबर ते दि.२६ सप्टेंबर या कालावधीत मौन व्रत व अनुष्ठान सुरू केले होते.अनुष्ठान व मौन व्रत समाप्ती झाल्यानंतर गुरुवर्य महंत श्री सुनीलगिरीजी महाराज,साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य,वेरूळ येथील नाथ आश्रमाच्या साध्वी अक्काजी महाराज यांचे उपस्थित सुवासींनीनी कुंकूम तिलक व पुष्पवृष्टी करत स्वागत केले.यावेळी मंगलवाद्य सनई तुतारीच्या गजरात मिरवणुक काढण्यात आली. यावेळी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य प्रकाशगुरू मुळे यांच्यासह ब्रम्हवृंद मंडळींनी केले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,विठ्ठल महाराज नाईक,शहाजी महाराज चिंधे,दिलीप महाराज खाटीक,शंकर महाराज तनपूरे,के एम बाबा फाटके महाराज,उदयकुमार बल्लाळ,विनायक लोळगे,सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ, सेवेकरी वैभव निकम यांच्यासह श्रीराम सेवा मंडळ मुकिदंपूर, नेवासा फाटा येथील सेवेकरी, माता भगिनी व ग्रामस्थ श्रीराम साधना आश्रमातील भक्तगण भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाआरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. उपस्थित भाविकांना बालाजी केटरर्सचे राजू महाराज व शाम महाराज यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



# आजीच्या अंत्यविधी पेक्षाही हक्काची लढाई मोठी ठरली!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

आमचा हक्क आम्हाला मिळालाच पाहिजे! यासाठी लढा सुरू होता पहिल्यापासुन लढ्यात सामिल नितीन सांगडे शिळवंडी ( ता.अकोले ) येथील आंदोलकाच्या आजीचे वृत्त समजते परंतु आजीच्या अंत्यविधीपेक्षा समाजासाठी सुरू असलेला लढा महत्वाचा मानुन आंदोलन स्थळीच थांबुन आंदोलन सुरू ठेवत समाजाच्या हक्काची लढाई जिंकली .

काही प्रसंग असे असतात की ते शब्दांत मांडताना शब्दही अपुरे पडतात आणि काही निर्णय असे असतात की त्यामागची वेदना समजून घेण्यासाठी डोळ्यांपेक्षा मन मोठे असावे लागते. सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी अकोले तालुक्यात झएड अंतर्गत १७ संवर्ग कर्मचारी पदभरतीच्या हक्कासाठी आंदोलन व उपोषण सुरू असताना, शिळवंडी गावचा सुपुत्र नितीन सांगडे याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.त्याच्या मनात एकच भावना होती आमचा हक्क आम्हाला मिळालाच पाहिजे!




# पश्चिम घाटाच्या मसुदा अधिसूचनेला माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची हरकत; मुदत दोन महिन्यांनी वाढविण्याची मागणी

**मंचर (समर्थ गांवकरी)**

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने पश्चिम घाट पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राबाबत (एड) २७ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचना क्र. एस.ओ. ४१०६(ई) बाबत माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी

केंद्र सरकारकडे तीव्र हरकत गुरुवार दिनांक २४ रोजी

नोंदविली आहे. स्थानिक नागरिक, शेतकरी आणि आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण करताना पर्यावरण संवर्धन व विकासाचा समतोल राखण्याची मागणी त्यांनी केली आहे.



माजी ग्रहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केंद्र

सरकारला पाठवल्या निवेदनात म्हटले आहे की खेड ,आंबेगाव, जुन्नर तालुक्याच्या १५० गावाच्या आदिवासी डोंगरी भागातील विद्यमान गावठाणे, निवासी क्षेत्रे, शेती, घरे आणि विकसित भागांचा योग्य अभ्यास करून आवश्यकतेनुसार त्यांना पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रातून वगळावे. रस्ते, शाळा, रुग्णालये, पिण्याचे पाणी, वीज आणि इतर मूलभूत सुविधांच्या विकासावर अनावश्यक निर्बंध येऊ नयेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे. ग्रामपंचायती, शेतकरी, स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींशी व्यापक सल्लामसलत करून सामाजिक-आर्थिक परिणामांचा अभ्यास करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. तसेच नागरिकांना मसुद्याचा सविस्तर अभ्यास करून हरकती व सूचना मांडण्यासाठी अंतिम मुदत आणखी दोन महिन्यांनी वाढवावी, अशी विशेष विनंती वळसे पाटील यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

# मुलगी घराची श्रीमंती, तिच्या जन्माने बाप खरा श्रीमंत होतो!



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

ज्या घरात मुलगी जन्माला येते, तो बाप जगातला सर्वात श्रीमंत बाप असतो, असा भावस्पर्शी संदेश देत हभप कार्तिकी महाराज मैड (सारोळा पठार) यांनी पालक, संस्कार आणि भगवंताच्या नामस्मरणाचे महत्त्व अधोरेखित केले. वडझिरे येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित धार्मिक कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

जन्मा येऊनिया देख । करा देहाचें सार्थक ।। वाचे नाम विठ्ठलाचें । तेणें सार्थक देहाचें ।। या संतवचनाचा आधार घेत महाराजांनी विठ्ठल नामाचे महत्त्व सांगितले. सुंदर नरदेह मिळाला आहे, तर त्याचे सार्थक भगवंताचे स्मरण, सत्कर्म आणि चांगल्या आचरणातून झाले पाहिजे. विठ्ठल नामात तिन्ही लोकांना तारण्याची शक्ती आहे, असे त्यांनी सांगितले.

**हभप कार्तिकी मैड यांचे वडझिरे येथे गणेशोत्सवात प्रभावी निरूपण..**

**गणेशाच्या आरतीचा मान विश्वनाथ कोरडे व दत्ता गाडगे यांना...**

‘मोबाईलपेक्षा आई-वडील अनमोल’

आजच्या बदलत्या जीवनशैलीवर भाष्य करताना महाराजांनी मोबाईलच्या अतिवापराबाबतही चिंता व्यक्त केली. आयफोनच्या मागणीवरून एका मुलाने टोकाचे पाऊल उचलल्याची घटना सांगत, आई-वडिलांपेक्षा कोणतीही वस्तू मोठी नाही, असा संदेश त्यांनी दिला. मुलांनी पालकांचे कष्ट आणि त्यांचे प्रेम ओळखावे. आई-वडिलांची सेवा हीच खरी संस्कृती आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आया-बहिणींचे रक्षण करा, छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण आचरणात आणा आणि आई-वडिलांची सेवा करा, असे आवाहनही त्यांनी केले.मुलीच्या जन्माचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले, बाप कितीही कणखर असला तरी मुलीच्या लग्नाच्या वेळी त्याच्या डोळ्यांत अश्रू येतात. मुलगी ही बापासाठी ओझे नसून आयुष्यभराची श्रीमंती आहे. याप्रसंगी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रमोद गवळी, कार्याध्यक्ष राज जुन्नरकर, उपाध्यक्ष संदीप गाडेकर, खजिनदार गणेश डहाळे, सचिव राहुल मोरे यांच्यासह अर्जुन डहाळे, कृष्णा डहाळे, ऋषिकेश मोरे, आदी करकंडे, गणेश मोरे, कुणाल मोरे, संकेत शेजवळ, नदीम पठाण, राजू शेठ मोरे, साईराज मोरे, पंडित डहाळे, प्रतीक करकंडे, योगेश तोडकर, ऋषिकेश गाडेकर, विशाल लंके, मंगेश शिंगोटे, राहुल टावरे आदींसह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिंभे-माणिकडोह बोगद्यासाठी आमदार रोहित पवार आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिला आंदोलनाचा इशारा

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

**''डिंभे-माणिकडोह बोगद्यामुळे कोणत्याही तालुक्याचे पाणी कमी न होता माझ्या मतदारसंघासह जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा आणि करमाळा या तालुक्यातील शेतकऱ्यांना एक जादा आवर्तन मिळणार आहे. परंतु या कामाला स्थगिती देण्यात आल्याचं कळतंय, ती का देण्यात आली हे कळत नाही. उलट जे नेते या बोगद्याला आज विरोध करत आहेत त्यांनीच २०१८ मध्ये बोगदा करण्याबाबत आणि डिंभे धरणातून तळापासून पाणी घेण्याबाबत शासनाला पत्र दिले होते, परंतु कोणत्याही तालुक्यावर अन्याय नको म्हणून २०२२ मध्येही आम्ही तत्कालीन जलसंपदामंत्र्यांसोबत बैठक घेऊन डिंभे धरणाची पाणी पातळी ७०९ मीटर (मध्यभागी) स्थिर ठेवून बोगदा करण्याचा निर्णय घेतला. तरीही विरोध होत असेल तर हा अन्याय आम्ही का सहन करावा? याबाबत सरकारने ५ ऑक्टोबरपर्यंत योग्य निर्णय घेतला नाही तर नाईलाजाने शेतकऱ्यांचं जनआंदोलन उभारावं लागेल, असा अल्टीमेटम जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिला. तसंच मतदारसंघात दुष्काळाची अत्यंत गंभीर स्थिती असून याबाबत पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी आणि माझ्या टीमकडून घेतलेल्या आढाव्याचा अहवालही त्यांना सादर केला आणि तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.''**

**(रोहित पवार, आमदार कर्जत-जामखेड)**

सरकारने स्थगिती दिलेल्या डिंभे-माणिकडोह जोड बोगदा प्रकल्पासाठी आमदार रोहित पवार हे आक्रमक झाले असून याबाबत त्यांनी आज जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची भेट घेऊन डिंभे-माणिकडोह बोगद्याची चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता तत्काळ पुनरुज्जीवित करुन बोगद्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली. तसेच येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, या बैठकीत त्यांनी कर्जत-जामखेडमधील दुष्काळी परिस्थितीचाही आढावा घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. याबाबतचे निवेदनही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

गेल्या काही महिन्यांपासून आक्रमक मोडमध्ये असलेले कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार हे आता मतदारसंघातील पाण्यासाठी मैदानात उतरले आहेत. डिंभे-माणिकडोड जोड बोगद्याचा विषय राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून चांगलाच गाजत आहे. या जोड बोगद्यासाठी आमदार रोहित पवार हे पहिल्या टर्ममध्ये आमदार झाल्यानंतर गेल्या ७ वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळातच तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांच्याकडून त्यांनी या बोगद्याला मंजुरी आणली आहे. १६ किलोमीटर लांबीच्या या जोड बोगद्यामुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर या कोणत्याही तालुक्याच्या हक्काचे १ थेंबही पाणी कमी न होता पावसाळ्यात डिंभे धरणातून वाहून जाणारे अतिरिक्त पाणी या बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात आणणे, हा या प्रकल्पाचा मूळ उद्देश आहे. माणिकडोह धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस पडत असल्याने साधारणपणे हे धरण पाच वर्षांतून एकदाच भरते. त्यामुळे डिंभे धरणातून वाहून जाणारे पावसाचे अतिरीक्त पाणी माणिकडोह धरणामध्ये आणण्यासाठी हा बोगदा लवकर होणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत-जामखेड आणि करमाळा या तालुक्यांना एक अतिरिक्त आवर्तन मिळून येथील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यासाठीच आमदार रोहित पवार यांनी २०२२ मध्ये तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांच्यासोबत बैठक घेऊन डिंभे धरणाची पाणी पातळी ७०९ मीटर (मध्यावर) कायम ठेवूनच हा बोगदा करण्याबाबत सर्वसहमती घडवून आणली आहे.

महाविकास आघाडी सरकार गेल्यानंतर आलेल्या सरकाकडेही या बोगद्याच्या कामाला तांत्रिक, प्रशासकीय आणि प्रत्यक्ष गती देण्याबाबत त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. तसेच पालकमंत्री, जलसंपदामंत्री आणि मुख्यमंत्री यांचीही वेळोवेळी भेट घेऊन त्यांनाही निवेदने दिली आहेत. नुकतीच शासनाने ५७०४ कोटी ५० लाख रुपये खर्चाला चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यताही दिली होती, परंतु आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या दबावामुळे १५ दिवसांपूर्वी या प्रकल्पाच्या चौथ्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेला सरकारने स्थागिती दिली आहे.

दरम्यान, कर्जत-जामखेडसह संपूर्ण जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर मागणी असलेल्या गावांमध्ये टँकर आणि चारा छावण्या सुरु करणे, उपलब्ध जलस्त्रोतातील पाणी नियोजन, विहिर व बोअरवेलचे अधिग्रहण, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये तर शेतमजुरांना प्रती कुटुंब २५ हजार रुपये मदत करणे, कर्जमाफी योजनेचा आढावा घेऊन तातडीने सर्वांना या योजनेचा लाभ देणे, नियमित कर्जदारांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान वितरीत करणे, चुकीच्या पीक कापणी प्रयोगांना आळा घालणे, विद्यार्थ्यांची संपूर्ण शुल्कमाफी, सीना प्रकल्पात आवर्तन सोडणे या सर्व मुद्द्यांवरही यावेळी चर्चा झाली आणि याबाबतचे निवेदनही आमदार रोहित पवार यांनी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच कर्जत-जामखेड मतदारसंघात वीज पुरवठ्याचाही प्रश्न गंभीर असून महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत पाठपुरावा सुरु आहे, परंतु नागरिकांना १२ तास सलग वीज पुरवठा झाला पाहिजे याबाबत जिल्हाधिकारी म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्याची मागणीही यावेळी आमदार रोहित पवार यांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याकडे केली.



PRAKASH RAMCHANDRA ROKADE
B.A.LL.B. ADVOCATE MOB. 9423560399 Office: B-3 Rahil Shopping Center, Nehru Bazar Junnar, Tal. Junnar, Dist. Pune. Pin: 410502.

दि. २१/०९/२०२६

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व आसपासच्या परिसरातील सर्व लोकांस व संस्थेच्या सभासदांना आमचे अशिल **मा. व्यवस्थापक राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे** यांनी समक्ष सांगितल्या वरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

**राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे** या संस्थेमध्ये श्री. आकाश सुखदेव शेलार रा. गायमुखवाडी पिंपरी पेंढार, ता. जुन्नर, जि. पुणे यांची दि. १/०७/२०२४ पासून **दैनंदिन वसुली प्रतिनिधी** म्हणून नियुक्ती केली होती. श्री. आकाश सुखदेव शेलार यांनी आमचे अशिल संस्थेकडे **दैनंदिन वसुली प्रतिनिधी** या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांचा राजीनामा आमचे अशिल संस्थेच्या संचालक मंडळाच्या सभा दि. १९/०८/२०२६, सभा क्र. ५, विषय क्र. १४ मधील ठरावानुसार मंजूर करण्यात आला आहे.

त्यामुळे सदर जाहीर नोटीसने जाहीर करण्यात येते की,

**व्यवहारास बंदी –** श्री. आकाश सुखदेव शेलार यांच्याशी राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेच्या संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचा पैशांचा अथवा इतर कोणताही व्यवहार करू नये.

**जबाबदारी –** या नोटीसच्या दिनांकानंतर तसेच दि. १८/०८/२०२६ नंतर जर कोणीही श्री. आकाश सुखदेव शेलार यांच्याशी राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेच्या नावावर पैशांची देवाण-घेवाण किंवा कोणताही व्यवहार केला, तर त्याला आमचे अशिल संस्था जबाबदार राहणार नाही. अशा व्यवहारांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील.

**अधिकृत आवाहन –** राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेच्या सर्व दैनंदिन ठेव / मुदत ठेव सभासद व कर्जदारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपली दैनंदिन ठेव / मुदत ठेव किंवा कर्जाचे हप्ते संस्थेच्या आळेफाटा शाखेत येऊन थेट जमा करावी किंवा संस्थेने नियुक्त केलेल्या नवीन अधिकृत प्रतिनिधीकडेच रीतसर पावती घेऊन जमा करावी.

सदर जाहीर नोटीस संस्थेचे हित आणि सभासदांच्या सुरक्षेसाठी तसेच कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून प्रसिद्ध केली असे.

**येणेप्रमाणे जाहीर नोटीस**

**जुन्नर,**
**दि. २१/०९/२०२६.**

**मा. व्यवस्थापक राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे तर्फे**

**ॲडव्होकेट .......ॲड. प्रकाश रामचंद्र रोकडे, ऑफिस नं. बी-३, तळमजला, राहिल शॉपिंग सेंटर, नेहरू बाजार, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. मो.नं. ९४२३५६०३९९.**

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### मंचर परिसरात दमदार पाऊस

**शेतकऱ्यांना दिलासा, आदिवासी भाग मात्र कोरडाच**

**मंचर (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्याच्या घोडेगावकडील पूर्व भागात रविवार दि.२० रात्रीपासून सोमवार दि.२१ पहाटेपर्यंत बऱ्यापैकी पाऊस झाल्याने गेल्या महिनाभरापासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.मात्र, तालुक्याच्या आदिवासी व डोंगरी भागात अद्यापही पावसाने हजेरी न लावल्याने तेथील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. पावसामुळे खरीप पिकांना काही प्रमाणात फायदा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.जमिनीतील ओलावा वाढल्याने पिकांना संजीवनी मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.सातगाव पठार परिसरात बटाटा काढणीसाठी अद्याप सुमारे पंधरा दिवसांचा अवकाश आहे. त्यापूर्वी झालेला पाऊस बटाटा पिकासाठी काही प्रमाणात दिलासा देणारा ठरला असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. रविवार दि.२० ते सोमवार २१ रोजी सकाळी आठ वाजेपर्यंतच्या पर्जन्यमानाच्या नोंदीनुसार घोडेगाव येथे २८ मिलिमीटर, मंचर येथे २३ मिलिमीटर, कळंब येथे १८ मिलिमीटर, पारगाव-निरगुडसर येथे १० मिलिमीटर, तर डिंभे येथे १ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. मात्र, आदिवासी डोंगरी भागात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे लागले आहे.

### शुभांगी गवळी यांना डॉक्टरेट पदवी

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील रहिवासी परिक्रमा फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंटच्या प्रा.शुभांगी प्रवीण गवळी-ढोबळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट मिळाली. अन इम्पॅक्ट ऑफ वर्क फ्रॉम होम ऑन वर्क-लाईफ बॅलन्स विथ स्पेशल रिस्पेक्ट टू इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी इंडस्ट्रीज हा विषय घेऊन डॉक्टरेट पदवी संपादन केली. डॉ. पद्मावती एस. इंगोळे यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले कडा ता.आष्टी हे त्यांचे माहेर कैलासराव ढोबळे यांची कन्या असताना पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण प्रवरानगर,पाचवी ते पदवीपर्यंतचे शिक्षण पुणे येथे मामा स्व.पुरुषोत्तम लगड व किशोर लगड यांनी केले. सन २०१२ साली माजी मंत्री बबनराव पाचपुते यांचे भाचे प्रविण गवळी यांच्या सोबत विवाह झाल्यानंतर सासरच्या मंडळींनी पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले.त्यामुळे मुल,कुंटुबाची जबाबदारी सांभाळून अतिशय खडतर परिश्रम घेऊन शुंभागीने हे यश मिळविले आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांची मावस बहीण तर कडा गावचे माजी सरपंच अनिल ढोबळे यांची ती पुतणी आहे. तिच्या या यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक बबनरावजी पाचपुते, अध्यक्षा डॉ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार विक्रमसिंह पाचपुते, लोकनियुक्त सरपंच साजन पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते, अक्देमी डायरेक्टर डॉ. इंद्रायणी पाचपुते, यांच्यासह परिक्रमा संकुल तसेच विविध क्षेत्रातील माध्यमातून डॉ. शुभांगीचे कौतुक होत आहे.

### आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये उत्साहाने सहभाग

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



**मुंबई (समर्थ गांवकरी)**

आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात उत्साहाने गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये सहभाग घेतला. त्यांच्यामध्ये एक वेगळाच उत्साह पहायला मिळाला, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनंत चतुर्दशीनिमित्त मुंबईतील गिरगाव चौपाटीवर आयोजित गणेश विसर्जनाच्या सोहळ्याच्या वेळी सांगितले. बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहाय्याने महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागासाठी दरवर्षीप्रमाणे उभारलेल्या विशेष दालनात भेट दिल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यटन विभागाने केलेल्या आयोजनाचे कौतुक केले. गणेश विसर्जन सोहळ्यास कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, बृहन्मुंबईच्या महापौर रितू तावडे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, पर्यटन संचालनालयाचे संचालक विकास पानसरे यांच्यासह परदेशी पर्यटक उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा राज्यउत्सव आहे. महाराष्ट्र पर्यटन विभागाने या उत्सवाला आंतरराष्ट्रीय स्वरुप दिले. आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात उत्साहाने गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये सहभाग घेतला. त्यांच्यामध्ये एक वेगळाच उत्साह पहायला मिळाला. विशेषतः येथील वातावरण व नियोजन पाहून आंतरराष्ट्रीय पर्यटक भारावून गेले. हजारो संख्येने लोक एकत्रित आल्यानंतर शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेला गणेश विसर्जन सोहळा अनुभवणे या पर्यटकांसाठी आनंदाचा क्षण होता.

# बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीच्या एक कोटींच्या देणगीतून सरस्वती विद्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या सरस्वती विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, विसापूर येथील नूतन शैक्षणिक इमारतीचे भूमिपूजन शुक्रवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांच्या एक कोटी रुपयांच्या भरीव देणगीतून या इमारतीच्या बांधकामाला प्रारंभ झाला असून, उर्वरित निधी संस्थेमार्फत उपलब्ध करून इमारत पूर्ण करण्यात येणार असल्याची ग्वाही यावेळी मान्यवरांनी दिली. भूमिपूजन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, श्रीगोंदा तालुक्याचे माजी आमदार राहुलदादा जगताप तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष व बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीचे मॅनेजर विश्वनाथ भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना बाबासाहेब भोस यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठीही संस्था





सातत्याने प्रयत्नशील राहील, असे सांगितले. नूतन इमारतीमुळे विद्यार्थ्यांना अधिक आधुनिक आणि सुसज्ज शैक्षणिक वातावरण उपलब्ध होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राहुलदादा जगताप यांनीही उर्वरित निधी संस्थेकडून उपलब्ध करून इमारतीचे बांधकाम पूर्ण केले जाईल, असे स्पष्ट केले. या प्रकल्पामुळे विसापूरसह पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना दीर्घकालीन शैक्षणिक लाभ होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला विसापूरचे सरपंच शिवाजी जठार, शाळा समिती सदस्या वासंती इथापे, माजी सरपंच धनंजय शिंदे, खंडू जठार, जब्बार सय्यद, सचिन जठार, विलास लगड, हरिश्चंद्र शिंदे, विष्णुपंत जठार, संतोष पंडित, जनार्दन जठार, संतोष शिवाजी जठार, शहाजी लगड, बाळासाहेब काटे यांच्यासह विसापूर व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य बाळासाहेब शेटे, शिक्षक अमोल यादव, बापू झेंडे, चौधरी, तांबोळी, सुरेश जठार तसेच शिक्षिका मयुरी यादव आणि वैशाली झेंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू जठार व अमोल यादव यांनी केले, तर आभार प्राचार्य बाळासाहेब शेटे यांनी मानले. नूतन इमारतीच्या उभारणीमुळे विद्यालयाच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून विद्यार्थ्यांना अधिक सक्षम शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## महाराजा कॉलेजच्या खो-खो मुलींची दिमाखदार झेप; तालुक्यात प्रथम, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलींच्या खो-खो संघाने तालुकास्तरीय शालेय स्पर्धेत दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या शानदार यशामुळे संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

छत्रपती विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, बेलवंडी येथे २३ व २४ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत महाराजा कॉलेजच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच सांघिक खेळ, अचूक नियोजन आणि जिद्दीच्या बळावर प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले. अंतिम सामन्यातही संघाने प्रभावी खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. संघाच्या विजयात नम्रता हरिहर, समीक्षा गरुड आणि गौरी यादव यांनी उत्कृष्ट बॅटिंग करत महत्त्वपूर्ण योगदान दिले. तर प्राजक्ता पाडळे, मेघा गायकवाड, गौरी सांगळे, जन्नत शेख, वैभवी पिलाने, कल्याणी शिरसट, साक्षी केदारी आणि श्रद्धा शेळके यांनी आक्रमक व प्रभावी अटॅक करत प्रतिस्पर्धी संघावर सातत्याने दबाव निर्माण केला संघाला क्रीडा शिक्षक संजय डफळ आणि क्रीडा संचालिका कल्पना बागुल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने साकारलेल्या या यशस्वी कामगिरीचे महाविद्यालय परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## उंडेमळा शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी महेश शिंदे यांची तर उपाध्यक्षपदी रोहिणी वाबळे यांची निवड

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



विद्यार्थ्यांचे शिक्षण, कल्याण आणि शाळेची जबाबदारी सुधारण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात येते. या धोरणानुसार मढेवडगाव येथील उंडेमळा जिल्हा परिषद शाळेत आयोजित माता पालक विशेष बैठकीत अध्यक्षपदी महेश गंगाधर शिंदे यांची व उपाध्यक्षपदी रोहिणी प्रदिप वाबळे यांची निवड करण्यात आली. सखी सावित्री मंचच्या अध्यक्षपदी श्रद्धा मोहन गायकवाड, उपाध्यक्षपदी अर्चना सोमनाथ खराडे यांची,महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी तृप्ती भरत शिंदे व उपाध्यक्षपदी टाकेश्वरी डिलीप नेताम यांची,विद्यार्थी सुरक्षा समितीच्या अध्यक्षपदी सागर शिवाजी गागरे, उपाध्यक्षपदी चंद्र भिमा पालवे यांची, शालेय भौतिक सुविधा विकसन समितीच्या अध्यक्षपदी सोमनाथ गोपाळ शिंदे यांची उपाध्यक्षपदी ऋषिकेश सुभाष वाबळे यांची निवड करण्यात आली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज सुपेकर, मा. अध्यक्ष नवनाथ उंडे, भरत शिंदे, जगदेव उंडे,सोमनाथ खराडे, दिलीप नेताम , प्रियंका शिंदे,मनिषा पालवे, सुलोचना मांडे आदि माता पालक उपस्थित होते. मुख्याध्यापक रामदास ठाकर यांनी प्रास्ताविक करून शालेय व्यवस्थापन समितीचे कार्य विषद केले. सूत्रसंचालन संतोष इंगावले यांनी आणि नवनाथ उंडे यांनी आभार मानले.

## महाळुंगे पडवळ परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; सहा ठिकाणी चोरी

**मंचर (समर्थ गांवकरी)**

महाळुंगे पडवळ-सैदमळा (ता. आंबेगाव) परिसरात गुरुवार दि.२४ रोजी पहाटे चोरट्यांनी धुमाकूळ घालत सहा ठिकाणी चोरी केली.सोन्याचे दागिने, चांदी, रोख रक्कम, मोबाईल आणि दुचाकी असा सुमारे दोन लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची प्राथमिक माहिती आहे.सोसायटी भरण्यासाठी घरात ठेवलेल्या रोख रकमेवर चोरट्यांनी डल्ला मारल्याचे समोर आले आहे.

सैदमळा येथील अनिल पंढरीनाथ आवटे यांच्या घराची खिडकी फोडून चोरट्यांनी प्रवेश केला. कपाटाची उचकापाचक करून शर्टात ठेवलेले दीड हजार रुपये, मोबाईल आणि दुचाकीची चावी चोरली.तसेच घराबाहेर नेलेल्या लाकडी कपाटातून सोसायटी भरण्यासाठी ठेवलेले एक लाख २५ हजार रुपये रोख रक्कम लंपास केली.जवळच राहणारे ऋतिक रविंद्र आवटे यांची दुचाकीही चोरट्यांनी पळवली.सुरेखा चंद्रकांत सैद यांच्या घराचा कडी-कोयंडा तोडून २० हजार रुपये रोख





आणि चांदीचे दोन जोड चोरले. अनंता जनार्दन आवटे व अलका अनंता आवटे हे मुंबईला गेले असताना त्यांच्या घरातून दहा हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेली. उत्तम मारुती आवटे यांच्या खिशातील २५ हजार रुपये चोरट्यांनी लंपास केले. सत्यभामा रघुनाथ सैद यांच्या घराचे कुलूप तोडून पेटी बाहेर नेण्यात आली. त्यातील दहा हजार रुपये चोरीस गेले. घटनास्थळी पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज वाघमारे यांच्यासह पोलिसांनी पाहणी केली.परिसरातील वाडी-वस्त्यांवर रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी युवा नेते प्रशांत सैद पाटील यांनी केली.

## अरणगाव येथे गणेश मुर्तीची विटंबना, ग्रामस्थांनकडुन घटनेचा निषेध, अरणगाव कडकडीत बंद

**धार्मिक भावना दुखावल्याचा अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल**

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड तालुक्यातील अरणगाव येथील श्री. अरणेश्वर मंदिराच्या समोरील सभामंडपात मुलांनी बसविण्यात आलेल्या गणपतीच्या मुर्तीची विटंबना करण्यात आली आहे. तसेच मंदिराच्या गाभाऱ्याचे गेटचे कुलुप देखील तोडण्यात आले असुन घटनास्थळी अज्ञात इसमाची चप्पल देखील आढळून आली आहे. या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी अमोल सिताराम निगुडे (वय ४० वर्षे, धंदा- शेती, रा. अरणगाव, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) यांनी जामखेड पोलीस स्टेशनला फीर्याद दिली आहे. फीर्यादी हे आपल्या कुटुंबासह अरणगाव येथे राहतात. या मंदिराची देखरेख करण्याचे काम फीर्यादी अमोल सिताराम निगुडे हे करत आहेत, तर शिवानंदन त्रिंबक दावणगिरे हे या मंदिरात पुजारी आहेत.

दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास फीर्यादी अमोल निगुडे हे अरणगाव येथे असताना, त्यांना रोहीत चावरे (रा. अरणगाव) यांचा फोन आला. रोहीत यांनी सांगितले की, आज दुपारी ३ ते ४ वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने अरणेश्वर मंदिराच्या गाभाऱ्याच्या बाहेरील बाजूस चप्पल सोडून दिली आहे. तसेच मंदिराच्या गाभाऱ्यातील गेटचे कुलूप तोडले आहे. मंदिरासमोर असलेल्या सभासमांडपात एका मित्र मंडळाने बसवलेल्या गणपतीच्या मूर्तीची देखील विटंबना करण्यात आली आहे.

फीर्यादी यांनी पाहणी केली असता वरील सर्व प्रकार प्रत्यक्षात त्यांच्या निदर्शनास आला. त्यानंतर ग्रामस्थांनी व





गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गणपतीच्या मूर्तीचे विसर्जन करून, अज्ञात इसमाविरुद्ध कायदेशीर तक्रार करण्यासाठी जामखेड पोलीस स्टेशन गाठले.

दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ ते ४ वाजेच्या दरम्यान घडलेल्या या प्रकारामुळे लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. या प्रकरणी अमोल निगुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध जामखेड पोलीस स्टेशनला फीर्याद दिली असून पुढील पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश अघाव हे करित आहेत.

# नगर तालुका व शहर पतसंस्थांसाठी एक दिवसीय कार्यशाळा संपन्न; संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

**जिल्ह्यातील सावकारी बंद करण्याचे श्रेय पतसंस्थांना जाते-वसंत लोढा**

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिल्हा बँकेत पतसंस्थांच्या ३०% ठेवी आहेत. पतसंस्थांचे प्रश्न सोडवणारा प्रतिनिधी जिल्हा बँकेत असावा. जिल्ह्यातील बेकायदेशीर सावकारी बंद करण्याचे श्रेय पतसंस्थांना जाते.पतसंस्था तोट्यात आल्यास संचालक जबाबदार, मग नफ्यातील वाटा मिळावा ही मागणी कायद्यात व्हावी. काही चुकीच्या प्रवृत्तीमुळे चळवळ बदनाम होते.नगर जिल्हा सहकाराला दिशा देणारा आहे.या उद्देशाने संगमनेर, पारनेर,जामखेड, पाथर्डी, राहाता येथे प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या.

नगर शहरात ४० पतसंस्था असून राजीव गांधी पतसंस्थेच्या ३०० कोटी तर जामखेडच्या गुगळे पतसंस्थेच्या अवघ्या ८ कर्मचाऱ्यांवर १७५ कोटी ठेवी आहेत.जिल्ह्यातील पतसंस्था चांगल्या पद्धतीने कार्यरत आहेत.असे प्रतिपादन नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांनी केले आहे.

सारसनगर येथील एडीसीसी बँकेच्या स्व.आ. शिवाजीराव कर्डिले सभागृहात नाशिक विभागीय फेडरेशन, राज्य फेडरेशन व जिल्हा-तालुका फेडरेशनच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या सहकार्याने आयोजीत पतसंस्थेचे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळाउद्घाटन जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.यावेळी १५ पतसंस्थांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे, नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा,सेवानिवृत्त सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे,सेवानिवृत्त उपनिबंधक तानाजी कवडे,अनिरुद्ध देवचक्के, राजीव गांधी पतसंस्थेचे अध्यक्ष उद्धव दुसुंगे, नगर तालुका फेडरेशनचे सुनील लोटके, शरामकृष्ण अर्बन चे संचालक विश्वनाथ कासट, लक्ष्मीकांत झंवर,अनुरीता झगडे, मराठा पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन उदय अनभुले,ज्ञानदेव पांडुळे, बाळकृष्ण काळे, लक्ष्मण सोनाळे,सुवालाल महर्षी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे अभय पितळे, गांधी, संतोष गांधी,निलेश लाटे, उमेश मेरगु,हरिभाऊ डोळसे,मुबारक शेख, निलेश दळवी, व्यवस्थापक महेश जाधव आदी उपस्थित होते.

काका कोयटे म्हणाले, पतसंस्थांचे प्रशिक्षण ही काळाची गरज असून हा खर्च नसून गुंतवणूक आहे. संचालकांना प्रशिक्षणाची जास्त गरज आहे. नेपाळमध्ये संचालकांना ३ दिवस प्रशिक्षण व परीक्षा अनिवार्य आहे.सहकार खात्याच्या परिपत्रकांकडे दुर्लक्ष होत आहे.चांगल्या पतसंस्थांना गौरव करणे आवश्यक आहे,.

जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे म्हणाले, २००८ साली ४६९ पतसंस्था अडचणीत आल्या. ठेवीदारांच्या रकमेतून कर्जवाटप होते, त्यामुळे व्यवस्थापक व संचालकांच्या निर्णयाचा थेट परिणाम संस्थेवर होतो. कर्मचारी प्रशिक्षित असणे, कायदे व परिपत्रकांचे वाचन, परतफेड क्षमता पाहून कर्जवाटप आणि एनपीए कमी करण्यावर भर द्यावा.

उद्धव दुसुंगे म्हणाले,जिल्हा बँकेत पतसंस्थांचे हजारो कोटी आहेत.त्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ करून पतसंस्थांचा संचालक जिल्हा बँकेत घ्यावा.

कार्यक्रमात शैलेश कोतमिरे यांनी पतसंस्था व कायदे, अनिरुद्ध देवचक्के यांनी संवाद कौशल्य





व व्यक्तिमत्व विकास आणि तानाजी कवडे यांनी आर्थिक मापदंड, गुणपत्रिका व एनपीए मॅनेजमेंट यावर मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन अमर एस. एस. यांनी केले, आभार सुनील लोटके यांनी मानले.

पुरस्कार प्राप्त संस्था : रामकृष्ण अर्बन, धनसंपदा (चखऊउ), भैरवनाथ (केडगाव), मराठा नागरी, याज्ञवल्क्या, मार्कंडेय, लक्ष्मीनारायण, सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी, लोकसेवा नागरी, राणी लक्ष्मी ग्रामीण, सद्गुरु ग्रामीण, निशा अंजली ग्रामीण, जैन ओसवाल ग्रामीण, मेहर ग्रामीण, पोस्टल डिव्हिजन को-ऑप क्रेडिट सोसायटी.

उत्कृष्ट व्यवस्थापक : शशिकांत पुंडलिक (रामकृष्ण), शंकरराव भोगाडे (राजीव गांधी), निलेश लाटे (पंडित दीनदयाळ).

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



## थोडक्यात पण महत्त्वाचे

### माळेगावातील तरुणांनी सांस्कृतिक उपक्रमातून जपला आदर्श!



राजूर (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील माळेगाव येथे ओम साई तरुण मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक, मनोरंजनात्मक व मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सायंकाळी होणाऱ्या या उपक्रमांमध्ये लहान मुले, युवक, महिला व ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत.संगीत खुर्ची, चमचा-लिंबू, पोता उडी, फुगे फोडणे, कबड्डी, खो-खो यांसह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. मोबाईल व दूरचित्रवाणीच्या युगात मुलांना मैदानी खेळांकडे वळविण्यासोबतच त्यांच्यात आत्मविश्वास, संघभावना व खेळाडूवृत्ती निर्माण करण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सर्व समाजबांधवांना एकत्र आणून सामाजिक एकोपा, बंधुभाव व ग्रामएकता जपण्याचा संदेश या तरुणांनी दिला आहे. मंडळाच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत असून कार्यक्रमांना महिला व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभत आहे.

### मंचर येथील शरद सहकारी बँकेची २६ सप्टेंबरला वार्षिक सभा

मंचर (समर्थ गांवकरी)

मंचर ता.आंबेगाव येथील शरद सहकारी बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि.२६ रोजी सकाळी ११ वाजता अवसरी खुर्द येथील कवयित्री शांता शेळके सभागृह, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय येथे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.अशी माहिती बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी दिली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात बँकेच्या सभासदांची संख्या ३१ हजार ६६५ झाली आहे. बँकेचे वसूल भागभांडवल ५१.३९ कोटी रुपये, गंगाजळी ५७.०९ कोटी रुपये, इतर निधी १६०.४० कोटी रुपये, तर स्वनिधी २६८.८८ कोटी रुपये झाला आहे.स्वनिधीत मागील वर्षाच्या तुलनेत १२.६४ टक्के वाढ झाली आहे.बँकेच्या ठेवी २ हजार २४.६९ कोटी रुपयांवर पोहोचल्या असून ठेवींमध्ये ८.५० टक्के वाढ झाली आहे.बँकेला १०.१८ कोटी रुपयांचा नफा झाला आहे.वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख यांनी केले.

### क्रांतिज्योती पतसंस्थेत भागवताचार्य साध्वी सुवर्णानंद चैतन्य महाराज यांच्या हस्ते आरती



नेवासे (समर्थ गांवकरी)

भागवताचार्य साध्वी सुवर्णानंद चैतन्य महाराज श्री दत्तसेवा संस्थान, चणकवाडी, पैठण,श्रीराम सेवा मंडळ,रामनगर मुकिंदपूर यांच्या हस्ते गुरुवार (दि.२४) रोजी नेवासे फाटा येथील क्रांतिज्योती नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये श्रींची आरती करण्यात आली.

यावेळी संस्थेच्यावतीने शाखाधिकारी सविता जावळे यांनी साध्वी महाराजांचा शाल,श्रीफळ देऊन यथोचित सन्मान केला याप्रसंगी कैलास मोहिते, पत्रकार राजेंद्र वाघमारे, हंडीनिमगावचे माजी सरपंच अण्णा पाटील जावळे,पतसंस्थेचे सर्व कर्मचारी,पदाधिकारी व श्रीराम सेवा मंडळाचे भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पतसंस्थेच्या वाटचालीस साध्वी महाराजांनी शुभाशीर्वाद दिले.

### २८ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीगोंदा तालुका पतसंस्थाचे एकदिवसीय कार्यशाळासंपन्न होणार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

नाशिक विभागातील नागरी ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्थांचे फेडरेशन लि. अहिल्यानगर,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन व श्रीगोंदा तालुका पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था (सर्व तालुके) अहिल्यानगर यांच्या सहकार्याने श्रीगोंदा तालुका पतसंस्थासाठी एकदिवसीय कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले आहे.सदर कार्यशाळा सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी ए स्टार हॉटेल, श्रीगोंदा येथे होणार आहे.यावेळी प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अध्यक्ष काका कोयटे हे उपस्थित राहणार आहेत.या कार्यशाळेत नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा,सेवा निवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे,से.नि.जिल्हा उपनिबंधक डॉ.सोपान शिंदे, सायबर तज्ज्ञ अथर्व भांबुरकर हे मार्गदर्शन करणार आहेत.या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेसाठी श्रीगोंदा तालुक्यातील पतसंस्थांच्या संचालक मंडळ अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.असे आवाहन श्रीगोंदा तालुका पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष सुरेश भंडारी यांनी केले आहे.

# ओतूर परिसरात गणरायांना भक्तिमय वातावरणात निरोप ; ढोल-ताशांच्या गजरात व 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने वातावरण दुमदुमले

ओतूरे (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर व परिसरात सार्वजनिक तसेच घरगुती गणेशोत्सवाची सांगता भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली. गणेशमूर्तींच्या विसर्जन मिरवणुकीत मोठ्या संख्येने गणेशभक्त सहभागी झाले होते. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

ओतूर शहरासह परिसरातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांनी आकर्षक सजावट, ढोल-ताशा पथके, लेझीम पथक आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाची मिरवणूक काढली. महिला, युवक तसेच बालगोपाळांनी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. अनेक ठिकाणी गणेशभक्तांनी गुलालाची उधळण आणि फुलांची आरास करत गणरायाला भावपूर्ण निरोप दिला.

विसर्जन मिरवणूक शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी यासाठी ओतूर पोलिसांकडून आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहण्यासाठी पोलिस व स्वयंसेवकांनी नियोजन ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. गणेशभक्तांनीही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत शांततेत गणेशमूर्तींचे विसर्जन केले.

यावेळी सार्वजनिक गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ, महिला, युवक आणि लहान मुलांची मोठी उपस्थिती होती. भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप देताना भाविकांच्या डोळ्यांत समाधानासोबतच पुढील वर्षी बाप्पाच्या आगमनाची उत्सुकता दिसून आली.

गणेश विसर्जनासाठी दशक्रियाघाट व श्री कपर्दीकेश्वर मंदिर या ठिकाणी ग्रामपंचायत आणि ग्रीन व्हिजन फाउंडेशन ओतूर यांच्या वतीने निर्माल्य संकलन उपक्रम राबविण्यात आला. दोन्ही ठिकाणीं दोन, दोन ट्रॅक्टर व ट्रॉलीज उपलब्ध करून दिल्या होत्या. श्री गणेश विसर्जनाच्या वेळी, आणलेले निर्माल्य नदीपात्रात टाकू नये तर तेथे उपलब्ध केलेल्या ट्रॉलीज मध्ये टाकावे. यामध्ये प्लॅस्टिक कचरा ,थर्माकोल त्याचबरोबर केळीचे खुंट, हार, फुले, नारळ आदी निर्माल्य वेगवेगळे करून, त्या त्या प्रकारच्या ट्रॉलीज मध्ये टाकून नदी प्रदूषण



टाळणे ह्या उपक्रमास, आपण सर्वांनी प्रामाणिकपणे सहकार्य करून, नदी प्रदूषण टाळून, पर्यावरण जपवणूक करून संवर्धनासाठीचे मदतीस सहकार्य मिळावे असे आवाहन ग्रीन व्हिजन फाउंडेशन, ओतूर यांच्या वतीने करण्यात आले होते.

## कोंढवळ धबधबा पुन्हा अतिवृष्टीमुळे प्रवाहित; पर्यटकांची गर्दी वाढली

मंचर (समर्थ गांवकरी)



श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरात बुधवार दि.२३ रोजी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे कोंढवळ धबधबा पुन्हा जोरदारपणे वाहू लागला आहे.जवळपास सव्वा महिन्याच्या विश्रांतीनंतर भीमाशंकर परिसरात मुसळधार पाऊस झाल्याने डोंगरभागातील ओढे-नाले पुन्हा प्रवाहित झाले असून, त्याचा परिणाम कोंढवळ धबधब्यावर झाला आहे.

गेल्या एक महिन्यापासून पावसाने उघडीप दिल्याने कोंढवळ धबधब्याच्या प्रवाहातील पाणी मोठ्या प्रमाणात कमी झाले होते.त्यामुळे धबधब्याचे आकर्षण काहीसे कमी झाले होते. धबधबा पुन्हा प्रवाहित झाल्याची माहिती मिळताच पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. धबधब्याचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी पर्यटक येत असले तरी पाण्याचा वाढलेला प्रवाह आणि घसरडा परिसर लक्षात घेऊन वन विभागाने सुरक्षेच्या कारणास्तव धबधब्यात उतरण्यास मज्जाव केला आहे.

**अतिवृष्टीमुळे कोंढवळ धबधबा पुन्हा जोरदार प्रवाहित झाला आहे. पर्यटकांना धबधबा पाहण्यास परवानगी आहे; मात्र वाढता पाण्याचा प्रवाह आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने धबधब्यात उतरण्यास सक्त मज्जाव करण्यात आला आहे. रणजीत जाधव वनपरिक्षेत्राधिकारी भीमाशंकर अभयारण्य.**

## 'आईसाठी काहीही!' १२ ज्योतिर्लिंगांसाठी ८ हजार किमी धावणारा मोनू कोपरगाव तालुक्यात

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

आईच्या आरोग्यासाठी मनात संकल्प घेऊन देशभरातील १२ ज्योतिर्लिंग आणि चार धामांची धावती यात्रा करण्याचा अनोखा संकल्प केलेला बिहारमधील धावपटू मोनू चव्हाण ऊर्फ 'बिहार का बेटा मोनू बेटोरावाला' सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहे. आपल्या या आगळ्यावेगळ्या संकल्पामुळे मोनू सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात चर्चेत आला आहे.

मोनूने बिहारमधील पाटणा-बेतौरा येथून आपल्या धावत्या यात्रेला सुरुवात केली आहे. ३६५ दिवसांत सुमारे ८ हजार किलोमीटर अंतर धावत पूर्ण करून देशातील १२



ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेण्याचा त्याचा संकल्प आहे. सोशल मीडियावर तो 'ब्लॅक पँथर' या नावानेही ओळखला जातो. ग्रामस्थ, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्याची भेट घेत त्याच्या संकल्पाचे कौतुक केले. अनेकांनी त्याच्यासोबत संवाद साधत पुढील यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. 'आईच्या आरोग्यासाठी घेतलेला नवस पूर्ण करण्यासाठी धावणारा मुलगा' म्हणून मोनूची ही यात्रा भावनिक संदेश देत आहे. हजारो किलोमीटरचा प्रवास, त्यातील अडचणी आणि शारीरिक कष्ट यांची पर्वा न करता तो आपल्या संकल्पाच्या दिशेने धावत आहे. मोनूची ही धाव म्हणजे केवळ अंतर पार करण्याची शर्यत नाही; ती आईच्या प्रेमाची, श्रद्धेची आणि संकल्पशक्तीची यात्रा आहे. त्याच्या या अनोख्या उपक्रमाला महाराष्ट्रातून मिळणारा प्रतिसादही त्याच्या यात्रेला नवी ऊर्जा देत आहे. 'जिथे श्रद्धा असते, तिथे अशक्य काहीच नसते; आणि महादेवावर विश्वास असेल तर संकल्प पूर्ण करण्याची ताकद मिळते,' असा संदेश देत मोनूची ही धावती यात्रा पुढे सुरू आहे.

**धावतोय शरीराने, पण ताकद आहे आईच्या प्रेमाची!**
**आईच्या आरोग्यासाठी घेतलेल्या संकल्पाला पूर्ण करण्यासाठी मोनू चव्हाण यांची अविरत धाव; त्यांच्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक.**

## कळसच्या आल्हाट बंधूंची उत्तुंग भरारी!

### विशाल आल्हाटची एमपीएससी परीक्षेत बाजी

अकोले (समर्थ गांवकरी)




अकोले तालुक्यातील कळस गावचा भूमिपुत्र विशाल प्रकाश आल्हाट याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे त्याचा मोठा भाऊ विक्रांत आल्हाट हादेखील नुकताच पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर रुजू झाला आहे. अत्यंत हलाखीच्या आणि प्रतिकूल परिस्थितीतून दोन्ही भावांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशामुळे कळस गावच्या मानात मानाचा तुरा रोवला गेला असून संपूर्ण तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

दोन्ही भावांच्या या दैदिप्यमान यशाची नोंद घेत कळस ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. अकोले तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे आणि जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे यांच्या शुभहस्ते विशाल आल्हाट व त्यांच्या पालकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

विशाल याचे प्राथमिक शिक्षण कळस येथील प्राथमिक शाळेत झाले, तर माध्यमिक शिक्षण कळसेश्वर विद्यालयात पूर्ण झाले. गावातीलच शाळेत शिक्षणाचा पायंडा रचून त्याने एमपीएससीसारख्या कठीण परीक्षेत हे यश मिळवले आहे. ग्रामीण भागातील मुलांसाठी विशाल आणि विक्रांत यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरत असून, सर्व स्तरांतून या आल्हाट बंधूंचे आणि त्यांच्या कष्टकरी पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले जात आहे.

## रयत क्रांती संघटनेच्या युवा आघाडी जिल्हाध्यक्षपदी पंढरीनाथ कोतकर; जिल्हा संपर्कप्रमुखपदी संदीप गवारे

नेवासा (समर्थ गांवकरी)

रयत क्रांती संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हा युवा आघाडी जिल्हाध्यक्षपदी नेवासा तालुक्यातील बाबुळवेढा येथील रहिवासी पंढरीनाथ हनुमंत कोतकर यांची, तर अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुखपदी संदीप रावसाहेब गवारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पंढरीनाथ कोतकर हे गेल्या अनेक वर्षांपासून विविध संघटनात्मक चळवळींमध्ये सक्रियपणे कार्यरत असून, शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे. तसेच संदीप गवारे यांनीही नेवासा तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात विविध सामाजिक व संघटनात्मक प्रश्नांवर काम केले आहे. शेतमजुरांचे प्रश्न, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्या, दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या तसेच इतर विविध प्रश्नांसाठी दोन्ही पदाधिकाऱ्यांनी आंदोलने आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

या संघटनात्मक कार्याची दखल घेत रयत क्रांती संघटनेच्या वतीने पंढरीनाथ कोतकर




आणि संदीप गवारे यांची अनुक्रमे अहिल्यानगर जिल्हा युवा आघाडी जिल्हाध्यक्ष आणि जिल्हा संपर्कप्रमुख या पदांवर नियुक्ती करण्यात आली.

संघटनेच्या नियम व धोरणांनुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, सोपविण्यात आलेली जबाबदारी पूर्ण निष्ठा, सचोटी आणि समर्पणाने पार पाडावी, तसेच संघटनेच्या प्रतिमेची जपणूक करावी, अशी अपेक्षा नियुक्तीपत्रात व्यक्त करण्यात आली आहे. या दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतर नेवासा तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पुढील संघटनात्मक कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# ओतूर शहरात गणेश विसर्जन मिरवणूक भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न

## बिबट्या-मानव संघर्षावर 'होळी चौकाच्या राजा' मंडळाचा जागरूकतेचा अनोखा संदेश

ओतूर (समर्थ गांवकरी)

गणपती बाप्पा मोरया,पुढच्या वर्षी लवकर या.. च्या जयघोषात आणि ढोल-ताशांच्या गजरात ओतूर नगरीतील गणेश विसर्जन मिरवणूक अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली.

यंदाच्या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले ते होळी चौकाचा राजा गणेश मंडळ. जुन्नर तालुक्यात वाढत्या बिबट्याच्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मंडळाने सामाजिक भान जपत एक हृदयस्पर्शी संदेश दिला. गेल्या काही महिन्यांत बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप जीवांना अनोख्या पद्धतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

वन वाचले पाहिजे, वन्यजीवही वाचले पाहिजेत, पण शेतकरीही उद्ध्वस्त होता कामा नये असा समतोल आणि विचार करायला लावणारा संदेश या देखाव्यातून देण्यात आला, ज्याचे सर्वत्र कौतुक होत



ओतूरचा सुखकर्ता श्री.संताजी गणेश मंडळ



ओतूरचा महाराजा नवोदित गणेश मंडळ वरील आळी



होळी चौकाचा देखावा

आहे. याचबरोबर नवोदित गणेश मंडळाचा ओतूरचा महाराजा आणि श्री संताजी गणेश मंडळाचा ओतूरचा सुखकर्ता यांच्या भव्य आणि आकर्षक मूर्तींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.सुखकर्ता बाप्पाची प्रसन्न आणि विशाल मूर्ती पाहून भाविकांचे मन अगदी प्रसन्न झाले. डीजेच्या तालावर तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग आणि ढोल-ताशा पथकाच्या थापेवर संपूर्ण ओतूर शहर दुमदुमून गेले होते.कोणताही अनुचित प्रकार न घडता, शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने सर्व मंडळांनी आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

पोलिसांचे कौतुकास्पद नियोजन

संपूर्ण गणेशोत्सव काळात आणि विसर्जन मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ओतूर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी श्री.ज्ञानेश्वर बाजगिरे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने अत्यंत सुंदर आणि चोख नियोजन केले होते. त्यांच्या दक्षतेमुळे कोणताही अनुचित प्रकार न घडता संपूर्ण गणेशोत्सव अत्यंत भक्तिभावाने आणि शांततेत संपन्न झाला,याबद्दल ओतूरकरांकडून पोलिस प्रशासनाचे विशेष आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९